प्रेसनोट

दिनांक १८/०८/२०२५

काशिगांव पोलीस स्टेशन, मिरा–भाईदर–वसई–विरार पोलीस आयुक्तालय या विभागातील, लोकसेवक श्री. भगवान मोहन पालवे, पद – पोलीस उप निरीक्षक, वर्ग – २, (अराजपत्रिक) यांचेविरूध्द सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
| स्टेशन डायरीनोंद क्र. | काशिगांव पोलीस स्टेशन, मिरा–भाईदर–वसई–विरार पोलीस आयुक्तालय<br>स्टेशन डायरी नोंद क्र. २२/२०२५ वेळ २०:२७ वा. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. भगवान मोहन पालवे, वय – ४२ वर्षे, पद – पोलीस उप निरीक्षक, वर्ग – २, (अराजपत्रिक) नेमणूक – काशिगांव पोलीस स्टेशन, मिरा–भाईदर–वसई–विरार पोलीस आयुक्तालय |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १५,०००/–रूपये |
| तडजोडीअंती स्वीकारलेल्या लाचेची रक्कम | १५,०००/–रूपये |
| थोडक्यात हकीकत | यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे भाऊ यांचेविरूध्द काशिगांव पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात अटक न करून गुन्हयामध्ये मदत करतो असे सांगून दिनांक १५/०८/२०२५ रोजी २५,०००/– रु लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दि. १५/०८/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे तक्रार दिलेली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १५/०८/२०२५ व १८/०८/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री. भगवान मोहन पालवे, पद – पोलीस उप निरीक्षक, वर्ग – २, (अराजपत्रिक) नेमणूक – काशिगांव पोलीस स्टेशन, मिरा–भाईदर–वसई–विरार पोलीस आयुक्तालय यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज दिनांक १८/०८/२०२५ रोजी सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता पुर्ण करून काशिगांव पोलीस स्टेशन येथे सापळा आजमाविला असता, सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री. भगवान मोहन पालवे, पद – पोलीस उप निरीक्षक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम स्विकारतांना काशिगांव पोलीस स्टेशनच्या इमारतीमध्ये १८:४५ वा. रंगेहात पकडण्यात आले आहे. नमुद लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :– १) श्री शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२) श्री सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३) श्री संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

---

लाचलुचपत प्रतिंबधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.

संपर्कपत्ता :–ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर ठाणे पश्चिम ४००६०१
सकेतस्थळ :– **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई–मेल :– **spacbthane @mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार
अॅप्लीकेशन :– **acbmaharashtra.net**
टोलफ्रि नंबर :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्स अॅप नं :– ९९३०९९७७००

( सुनिल कोरोटे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो
ठाणे